# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ / फाल्गुन १२, १९४३ (शके)

२२. **मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला सुधारणा :**

"विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात शुक्रवार, दिनांक ४ मार्च व शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी घेण्याचे प्रस्तावित आहे. मा. राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास एका सदस्यास दहापेक्षा अधिक सुधारणा देता येत नाहीत अशी तरतूद म.वि.स. नियम ६१ मध्ये करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येते की, **ज्या सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा द्यावयाच्या असतील त्यांनी सुधारणांच्या सूचना तीन प्रतींमध्ये 'अ' कक्ष, कक्ष क्रमांक ११०३, अकरावा मजला, विधानभवन, मुंबई येथे किंवा** a१.assembly.mls@gmail.com **या ई-मेलवर** (DVOT-Surekh **या** Font **मध्ये) गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील या बेताने पाठवाव्यात.**

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)